**M.A. (PART- II)**
**MARATHI**
**Study of an Ancient Period**
**(Paper – II) April 2016**

QP Code : **21036**

(३ तास) (एकूण गुण : १००

*सूचना :* (१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
(२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

१. (अ) बहामनी काळातील मराठी साहित्याच्या निर्मितीमागील विविध प्रेरणांची सविस्तर चर्चा करा.

किंवा

(ब) कालखंडाच्या अभ्यासामागील विविध घटकसूत्रांचे साधार विवेचन करा.

२. (अ) संत एकनाथांच्या वाङ्मयाची विविधता स्पष्ट करा व त्यांनी केलेल्या लेखनातून तत्कालिन राजकीय व सामाजिक परिस्थितीशी असलेले अनुबंध सोदाहरण लिहा.

किंवा

(ब) टिपणे लिहा :--
(१) 'रूक्मिणी स्वयंवर'-उपदेशपरता.
(२) भावार्थ रामायणातील काव्यात्मकता.

३. (अ) मुक्तेश्वरांच्या आख्यान काव्यातून बहामनीकालिन राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब कसे उमटले आहे ते सविस्तर सांगा.

किंवा

(ब) टिपणे लिहा :--
(१) मुक्तेश्वरांच्या महाभारतातील विपर्यास विशेष.
(२) मुक्तेश्वरांच्या संक्षिप्त रामायणाचे रूपविशेष.

४. (अ) 'संत तुकारामाच्या अभंगानी तत्कालिन बहुजन समाजाला मोलाचे मार्गदर्शन केले.' या विधानाची चर्चा करा.

किंवा

(ब) टिपणे लिहा :--
(१) तुकारामांच्या अभंगातील उपदेशपरता.
(२) तुकारामांच्या अभंगातील आत्मपरता.

५. (अ) इस्लाम धार्मिय कवींच्या काव्यलेखनामागील प्रेरणा स्पष्ट करा व त्यांच्या वाङ्मयाचा सविस्तर आढावा घ्या.

किंवा

(ब) टिपणे लिहा :--
(१) जैनधर्मियांचे वाङ्मयविशेष.
(२) ख्रिस्ती धर्मियांच्या वाङ्मयाचे स्वरूप.

———v———

**M.A. (PART- II)**
**MARATHI**
**Theory of Literature**
**(Paper – IV) April 2016**

**QP Code : 21177**

(३ तास) [ एकूण गुण : १००

**सूचना :** (१) सर्व प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.
(२) सर्व प्रश्नांना **समान** गुण आहेत.

१. (अ) कल्पनाशक्तीच्या संदर्भात पाश्चात्त्य विचारवंतांच्या भूमिका सविस्तर विशद करा.

**किंवा**

(आ) थोडक्यात टिपा लिहा.
(१) प्लेटोचा अनुकृती सिद्धांत
(२) ॲरिस्टॉटलचा अनुकृती सिद्धांत

२. (अ) साहित्याच्या प्रयोजनासंदर्भातील विविध उपपत्तींचा परामर्श घ्या.

**किंवा**

(आ) थोडक्यात टिपा लिहा.
(१) साहित्यकृतीची भाषिक, कल्पनात्मक आणि रचनात्मक अंगे
(२) साहित्यप्रकाराची संकल्पना

३. (अ) 'अस्तित्ववाद' ही वाङ्मयीन प्रवृत्ती ठरते का? चर्चा करा.

**किंवा**

(आ) थोडक्यात टिपा लिहा.
(१) वास्तववादाच्या मर्यादा
(२) स्वच्छंदतावादाच्या मर्यादा

४. (अ) साहित्यभाषेच्या महत्त्वाच्या वैशिष्ट्यांची योग्य उदाहरणे देऊन चर्चा करा.

**किंवा**

(आ) थोडक्यात टिपा लिहा.
(१) कथनात्म साहित्याचे प्रकारलक्ष्यी विशेष
(२) साहित्यकृतीच्या महानतेचे निकष

५. (अ) ''साहित्यप्रकाराची संकल्पना शाश्वत आहे असे तुम्हांस वाटते का?'' – सविस्तर चर्चा करा.

**किंवा**

(आ) थोडक्यात टिपा लिहा.
(१) कलामूल्ये
(२) नियमोल्लंघनाचे तत्त्व

---

**SP-Con. 5706-16.**

**M.A. (PART- II)**
**MARATHI**
**Applied Criticism**
**(Paper – VI) April 2016**

**QP Code : 21480**

(३ तास) एकूण गुण : १००

सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहेत.
(२) सर्व प्रश्नांना **समान गुण** आहेत.
(३) प्रश्न **क्रमांक ५ ला अंतर्गत पर्याय** नाही.

१. (अ) समीक्षा व्यापाराचे स्वरुप व उद्दिष्टे स्पष्ट करून, चांगल्या समीक्षकाकडे कोणते गुणविशेष असले पाहिजेत त्यावर चर्चा करा.

**किंवा**

(ब) साहित्य समीक्षेतील वाचन, अर्थनिर्णयन आणि मूल्यमापन या पायऱ्यांचा सविस्तर परिचय करून द्या.

२. (अ) युंग, नॉथ्रोप फ्राय व सुझान लँगर यांनी समीक्षेसंदर्भात मांडलेलेल सिध्दांत सविस्तर विशद करा.

**किंवा**

(ब) 'सिमॉन दी बुव्हा आणि एलन शोवॉल्टर यांनी मांडलेल्या सिध्दांतांचा मोठा प्रभाव स्त्रीवादी साहित्यसमीक्षेवर आहे' – या विधानाचा मागोवा घ्या.

३. (अ) 'साहित्यकृतीचे अर्थनिर्णयन संहिताबाह्य घटकांच्या संदर्भाने लावण्याऐवजी ते संहितेअंतर्गत घटकांच्या आधारेच शोधावे' – हे विधान रुपवादी समीक्षेसंदर्भात योग्य ठरते का? ऊहापोह करा.

**किंवा**

(ब) **कोणत्याही दोन** कवितांची रुपलक्ष्यी दृष्टीने समीक्षा करा.
(१) 'नट' – कुसुमाग्रज
(२) 'बहिऱ्या – मुक्यांची दिंडी' – दिलीप चित्रे
(३) 'आपण माणूस म्हणून जन्माला आलो' – वसंत गुर्जर
(४) 'रंग महाली विठूच्या' – अरुणा ढेरे

४. (अ) फ्राईड व युंगाच्या मानसशास्त्रीय सिध्दांताचा प्रभाव साहित्य समीक्षेवर कसा पडला आहे ते सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) 'राजा ईडिपस' या नाटकाची मानसशास्त्रीय समीक्षा करा.

५. 'वज्राघात' या हरी नारायण आपटे यांच्या कादंबरीची रुपवादी दृष्टीने समीक्षा करा.

---

**M.A. (PART- II)**
**MARATHI**
**Dalit Sahitya**
**(Paper – VIII) April 2016**

**QP Code : 21633**

(३ तास) (एकूण गुण : १००

सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.
(२) सर्व प्रश्नांना समान **गुण** आहेत.

१. (अ) दलित साहित्यप्रवाह आणि इतर साहित्यप्रवाह यांचा परस्परांशी असलेला अनुबंध सविस्तर लिहा. २०

**किंवा**

(ब) दलित साहित्याची संकल्पना स्पष्ट करून दलित चळवळींचा मागोवा घ्या.

२. (अ) 'सायरनचे शहर' मधील धर्मकेंद्री आणि समाजविश्लेषणात्मक कवितांचा परामर्श घ्या. २०

**किंवा**

(ब) दलित व्यक्तींचा जीवन जगण्यासाठीचा संघर्ष 'वाट तुडवताना' या आत्मकथनातून कसा चित्रित झाला आहे. ते साधार लिहा.

३. (अ) 'शूद्र' मधील नागनाथच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचे विवेचन करा. २०

**किंवा**

(ब) गंगाधर पानतावणे यांची दलित साहित्य आणि दलितेत्तराचे साहित्य याविषयीचे चिंतन 'साहित्यः शोध आणि संवाद' च्या आधारे स्पष्ट करा.

४. (अ) 'परिव्राजक' मध्ये गौतमीपुत्र कांबळे यांनी मूल्ययुक्त जीवनदृष्टीचा शोध कसा घेतला आहे. ते सोदाहरण लिहा. २०

**किंवा**

(ब) निब्बाण हे भूत, भविष्य आणि अस्वस्थ वर्तमान यावर प्रकाशझोत टाकणारे नाटक आहे- हे विधान स्पष्ट करा.

५. टिपा लिहा (कोणत्याही **दोन**) २०
(अ) 'सायरनचे शहर' मधील प्रतिमासृष्टी
(ब) 'परिव्राजक' मधील संस्कृतिसंघर्ष
(क) 'शूद्र' कादंबरीतील बुध्द तत्त्वज्ञान
(ड) उत्तम कांबळे यांची पत्रकारिता

..................

**M.A. (PART- II)**
**MARATHI**
**Lok Sahitya**
**(Paper – VIII) April 2016**

**QP Code : 21636**

(३ तास) (एकूण गुण : १००

सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
(२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

१. (अ) लोकसाहित्याचे स्वरूप समजून घेताना लोकजीवनाशी निगडित कोणकोणत्या गोष्टींचा विचार करावा लागतो ते सविस्तर सांगा.

किंवा

(ब) लोक साहित्यातून प्रतिबिंबित होणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जाणीवांचे स्वरूप विशेष सविस्तर स्पष्ट करा.

२. (अ) लोककथा ही संकल्पना स्पष्ट करा व लोककथेचे विशेष लिहा.

किंवा

(ब) 'दशावतार' व 'जागर' या लोकनाट्यप्रकारांचे स्वरूप स्पष्ट करा.

३. (अ) 'मराठी लोककथा' या संग्रहातील लोककथांचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

(ब) 'मराठी लोककथा' या संग्रहातील लोककथांचा समाजाच्या अंतर्लक्ष्यी व बहिर्लक्ष्यी संबंध स्पष्ट करा.

४. (अ) 'रानभूल' या नाटकातून आदीवासी लोकांच्या शोषणाच्या कथा आणि व्यथा कशाप्रकारे साकार झाल्या आहेत ते सांगा.

किंवा

(ब) 'रानभूल' हे नाटकाच्या संहितेचे स्वरूप विशेष स्पष्ट करा व या नाटकातील संघर्षाचे स्वरूप सांगा.

५. (अ) 'लोकमानसातील पारंपारिक कोळीगीते' या संग्रहातील सागरसंस्कृतीचे विशेष सोदाहरण लिहा.

किंवा

(ब) 'लोकमानसातील पारंपारिक कोळीगीते' या संग्रहातील कोळीगीतांच्या संरचनेची वैशिष्टये सोदाहरण स्पष्ट करा.

................